# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.07.2024** **वार – बुधवार**

---

**झिका**

पुण्यात झिका विषाणूचा संसर्ग वाढत असून पुण्यात आणखी तीन जणांना संसर्ग झाला आहे.पाषाण परिसरातील दोन गर्भवती आणि उजवी भुसारी कॉलनीतील 15 वर्षांचा मुलगा अशा तीन जणांना झिका विषाणूच्या संसर्गाचं निदान झालं आहे. त्यामुळे शहरातील झिकाच्या रुग्णांची संख्या पंधरापर्यंत वाढल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली.रुग्ण आढळलेल्या भागातील गर्भवतींच्या तपासणीला प्राधान्य देण्यात येत आहे. सर्वेक्षण चांगलं होत असल्यानं रुग्णांवर लवकर उपचार होत आहेत. मुंढवा, पाषाण, खराडी आणि कळस परिसरातील 31 महिलांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूशास्त्र संस्थेकडे पाठवले असल्याची माहिती पुणे महापालिका आरोग्य प्रमुख डॉक्टर कल्पना बळीवंत यांनी दिली आहे.

**पीकविमा**

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप 2023 अंतर्गत सहभागी झालेल्या शेतक-यांना पीक नुकसान भरपाई म्हणून 7 हजार 149 कोटी 28 लाख रूपये विमा रक्कमेपोटी आजअखेर 3 हजार 965 कोटी 31 लाख रूपये शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहेत. उर्वरित 3 हजार 183 कोटी 9 लाख 29 हजार रूपये वितरणाचं काम सुरू असल्याचं पुणे कृषी आयुक्तालयानं सांगितलं. केवळ एक रूपया भरून राज्य सरकारच्या पीक विमा योजनेत सहभागी झाल्यामुळं पिकांच्या नुकसानाच्या प्रसंगातत शेतक-यांना पीक विमा योजनेचा मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. यावर्षीही पीक विमा योजनेत आधिकाधिक शेतक-यांनी सहभागी व्हावं असं आवाहन कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी केलं आहे.

**दरड प्रवण**

पुणे जिल्ह्याच्या दरड-प्रवण भागातील सर्वाधिक धोकादायक बनलेल्या 3 गावांच्या संपूर्ण पुनर्वसनासाठी जिल्हा प्रशासनाकडून 58 कोटी 46 लाख रुपयांच्या निधीची मागणी राज्य शासनाकडं करण्यात आली आहे. दोन वर्षांपूर्वीच त्यासाठीचा संपूर्ण आराखडा राज्य शासनाला सादर करण्यात आला असून त्यानंतर राज्य शासनानं या प्रस्तावाचा अधिक अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र उपसमिती

नियुक्त केली आहे. भोर तालुक्यातील 2 आणि मुळशी तालुक्यातील एका गावाच्या पुनर्वसनाचे हे प्रस्ताव असून गेल्या अनेक वर्षांपासून त्याबद्दलचा लेखी पत्रव्यवहार सुरु आहे. जिल्ह्यात एकंदर 23 गावं दरड-प्रवण भागात येत असून तिथल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी एकंदर 319 कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे.

**दस मे बस**

पुणेकरांच्या आवडीच्या पुण्यदशम 'दस मे बस' उपक्रमाची तीन वर्षे यशस्वीपणे पार पडल्याच्या निमित्तानं बसचालक आणि वाहकांचं सपत्नीक पाद्यपूजन करत सन्मान करण्यात आला. स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांमध्ये बसची प्रतिकृती असणारा केक कापून पुण्यदशम योजनेचा वाढदिवस साजरा करण्यात आला. पुणेकरांना अवघ्या दहा रुपयांत दिवसभर शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये फिरण्यासाठी 'दस मे बस' योजनेची सुरुवात झाली होती.

**स्थगिती**

पानशेत पूरग्रस्तांना गोखलेनगर इथल्या म्हाडाच्या इमारतींवर आकारण्यात आलेल्या वाढीव बांधकामावरील करास स्थगिती देण्यात आली असून पुढील धोरण ठरेपर्यंत ही स्थगिती कायम राहील असं मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत आमदार शिरोळे यांच्या लक्ष्यवेधी सूचनेवर सांगितलं. शासनानं पूरग्रस्त नागरिकांच्या बांधकामासाठी स्वतंत्र धोरण ठरवावं. तोपर्यंत वाढीव बांधकामांवर सवलतीच्या दरानं मिळकत कर लावावा आणि आजवरचा दंड तातडीनं माफ करावा, अशी मागणी शिरोळे यांनी केली होती.

**स्थायी**

पिंपरी चिंचवड महापालिकेची स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकास कामांच्या आर्थिक तरतुदींना मान्यता देण्यात आली. यामध्ये बालसंगोपन केंद्र,बालवाडी, विनाअनुदानित शाळा,महाविद्यालयं आदी संस्थांच्या इमारतींसाठी अग्निसुरक्षा प्रमाणपत्राच्या सेवा शुल्कामध्ये घट करण्यात आली असून ते आता 10 रुपयांऐवजी 4 रुपये प्रती चौरस मीटर करण्यात आलं आहे.

**पीएचडी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेची अर्ज प्रक्रिया आजपासून सुरू झाली असून 10 ऑगस्ट अंतिम मुदत आहे. याची परीक्षा संगणक प्रणालीवर 24 ऑगस्टला पुणे, अहमदनगर आणि नाशिक शहरातील केंद्रामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे.

**कबड्डी**
महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या मान्यतेनं पुण्यात होणाऱ्या वरिष्ठ महिला आणि पुरुष गटाच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुण्याचा संघ जाहीर झाला असून अपूर्वा मुरकुटे आणि सुनील दुबिले यांच्याकडे पुणे शहराचं तर सलोनी गजमल आणि सुलतान डांगे यांच्याकडे पुणे ग्रामीण संघाचं नेतृत्व सोपवण्यात आलं आहे. 15 ते 20 जुलै दरम्यान या स्पर्धा होत आहेत.

**परवाना रद्द**
पुण्यातील वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मद्य पिऊन वाहन चालवल्यास वाहन चालविण्याचा परवाना रद्द केला जाण्याची शक्यता आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी न्यायालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. कारवाई किंवा दंड करूनदेखील अपघातांमध्ये घट झालेली नसल्यानं पुणे पोलिसांनी मोठा निर्णय घेण्याचं ठरवलं असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**सन्मान**
पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं पॅराऑलिंपिक सुवर्ण पदक विजेते  मुरलीकांत पेटकर यांचा सन्मान पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पेटकर यांनी लष्करी सेवेत असतानाचे विविध प्रसंग, पॅराऑलिंपिकमध्ये भाग घेतल्यानंतर विविध खेळांमध्ये केलेली चमकदार कामगिरी तसंच व्यक्तीगत जीवनात घडलेल्या अनेक घटना सांगितल्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**